# मराठी उद्यमशीलता आखातात बहरावी : कडवे

सकाळ वृत्तसेवा

Thursday, March 11, 2010 AT 12:00 AM (IST)
Tags: gmbf, mahabiz, uae, dubai, marathi, business, international,

दुबईत २३ आणि २४ एप्रिलला पहिली आखाती मराठी उद्योजक परिषद (महाबिझ) होणार आहे. गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमने (जीएमबीएफ) या उपक्रमाचे आयोजन केले आहे. महाराष्ट्रीय उद्योजकांना नवे क्षितिज खुले व्हावे आणि आखाती प्रदेश व महाराष्ट्रादरम्यानचा व्यापार-उद्योग वाढावा, असा या परिषदेचा प्रमुख हेतू असल्याचे निमंत्रक आणि "जीएमबीएफ'चे संस्थापक संदीप कडवे यांनी सांगितले. परिषदेच्या निमित्ताने 'इ-सकाळ'कडे त्यांनी व्यक्त केलेले मनोगत.

**प्रश्न** - पहिली आखाती मराठी उद्योजक परिषद दुबईतच घेण्यामागे हेतू काय?

**उत्तर** - दुबई ही संयुक्त अरब अमिरातीची व्यापारी राजधानी आहे. देशाची राजधानी अबुधाबी असली, तरीही दुबईचा गेल्या दशकातील विस्तार थक्क करणारा आहे. अक्षरशः वाळवंटातून हे महानगर उदयाला आले आहे. मी हा प्रवास पाहिला आहे. महाकाय जाबेल अली बंदर, शेख झईद मार्गावरील उत्तुंग इमारती, मानवनिर्मित बेट, मेट्रो रेल्वे, कार्यक्षम ई गव्हर्नन्स सुविधा, महाकाय शॉपींग मॉल्स, संयुक्त अरब अमिरातीच्या अख्ख्या लोकसंख्येच्या दुप्पटीने भेट देणारे पर्यटक आणि अत्यंत दूरदर्शी नेतृत्व यामुळे दुबईला आखाती प्रदेशातच नव्हे, तर संपूर्ण मध्य-पूर्वेत अतुलनीय स्थान प्राप्त झालेले आहे.
अनिवासी भारतीयांसाठी दुबई हे रोजगार, पर्यटन, व्यवसाय अथवा खरेदीसाठी अत्यंत आवडीचे ठिकाण आहे. भारताची आर्थिक राजधानी मुंबईपासून अवघ्या अडीच तासांच्या हवाई अंतरावर दुबई आहे. दुबई आणि मुंबईत अनेक साम्य आहेत. त्यामुळे महाराष्ट्रीयन माणसाला व्यवसाय अथवा करियरसाठी दुबई हे सर्वोत्तम शहर आहे.

अर्थात, याचा अर्थ आखातातील मस्कत, ओमान, बहारिन आणि कुवेत ही शहरे कमअस्सल आहेत, असा अजिबात नाही. या प्रत्येक शहरांची ज्याची त्याची खासियत आहेच.

**प्रश्न** - गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम कधीपासून कार्यरत आहे?

**उत्तर** - मार्च २००४ पासून अशा स्वरुपाच्या मंचाची स्थापना करण्यासाठी मी प्रयत्न सुरू केले होते. जून २००४ मध्ये हा मंच स्थापन झाला. आतापर्यंत या मंचाचा फायदा तीनशेहून अधिक उद्योजक, व्यावसायिकांना झाला आहे.

**प्रश्न** - गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमचे सदस्य किती आहेत?

**उत्तर** - संयुक्त अरब अमिरातीमध्ये आमचे शंभर सक्रिय सभासद आहेत.

**प्रश्न** - फोरमतर्फे यापूर्वी कोणत्या स्वरुपाचे काम झाले आहे?

**उत्तर** - "जीएमबीएफ'ची प्रत्येक सभा, बैठक ही सभासदांसाठी नवीन काहीतरी घेऊन येते. फलदायी ठरते. वेळेची कमतरता आणि कायमस्वरुपी जागा नसल्याने सध्या तरी दोन महिन्यांतूनच आम्ही एकत्र येतो. प्रत्येक बैठकीत नवीन सदस्यांची भर पडते आहे. काही व्यावसायिकांनी "जीएमबीएफ'मधील "नेटवर्किंग'चा अत्यंत कुशलतेने वापर केला आहे. काही लोक असा वापर करत नाहीत. रोजच्या जीवनातच त्यांना सुरक्षितता वाटते. ते येतात. पाहतात आणि जातात. पण, प्रत्येकाने या उपक्रमाचे कौतूक केले आहे. आम्हाला आमच्या वाढीच्या मर्यादा नीटपणाने माहिती आहेत. स्थानिक कायदे, नियम आणि मुख्य म्हणजे आर्थिक परिस्थितीची पूर्ण जाणिव आहे. त्यातून मार्ग काढत आम्हाला प्रगती करायची आहे. तीही एकेकट्याने नव्हे, तर सामुहिकरित्या.

**प्रश्न** - उद्योजक परिषदेचे उद्देश काय आहेत?

**उत्तर** - मुळचे महाराष्ट्रीय असलेल्या लोकांमध्ये उद्यमशीलता निर्माण करणे, त्यांच्यातील अनुभवांची देवाण-घेवाण करणे, माहितीचे आदान-प्रदान करणे आणि सहकारी उद्योजकाला शक्य त्या ठिकाणी मदत करणे हे प्रमुख उद्देश आहेत. संयुक्त अरब अमिरातीमध्ये महाराष्ट्र उद्योग भवन उभारण्याचे "जीएमबीएफ'चे स्वप्न आहे.

त्यादृष्टिनेही प्रयत्न करीत आहोत. आखाती प्रदेश आणि महाराष्ट्रात व्यवसायासाठी उत्सुक गुंतवणूकदार, उद्योजक, व्यावसायिकांना असे भवन मध्यवर्ती ठरू शकणार आहे.

**प्रश्न -** सामान्य उद्योजकाला "जीएमबीएफ'चा फायदा कसा घेता येईल?

**उत्तर -** "जीएमबीएफ'चे यश काही उदाहरणांवरून मोजता येईल. इथे आल्यावर काही जणांनी त्यांच्या नोकऱ्या सोडण्याचे आणि उद्योग जगतात पाऊल टाकण्याचे धाडस दाखविले आहे. इथल्या "नेटवर्किंग'चा फायदा काहींना त्यांच्या व्यवसायासाठी नवीन ऑर्डर्स मिळण्यात झाला आहे. काही भागीदार बनले, तर काहींना नवे प्रकल्प मिळाले. आम्ही सभासदांना आपांपसात संभाषणासाठी प्रवृत्त करतो. पहिल्यांदा त्यांना मदत करतो. त्यानंतर त्यांना त्यांच्या करियरमध्ये वाढीसाठी आम्ही जरूर ती मदत करतो.

**प्रश्न -** पहिल्या उद्योजक परिषदेत प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. प्रदर्शनाचे स्वरूप काय आहे आणि यामध्ये कोणा-कोणाला सहभागी होता येईल?

**उत्तर -** "महाबिझ् २०१०, दुबई'मध्ये परिषदा, चर्चासत्रे, विविध विषयांवर सर्वंकष चर्चा, प्रदर्शनाच्या निमित्ताने विक्रेता आणि खरेदीदार यांची आमने-सामने ओळख असे विविध उपक्रम समाविष्ट आहेत. प्रदर्शनामध्ये कृषी, अन्नप्रक्रिया उद्योग, एमसएमई, प्रसारमाध्यमे, पर्यटन, शिक्षण, आरोग्य, अभियांत्रिकी, रासायिनक, माहिती तंत्रज्ञान, व्यापारी सेवा आदी उद्योग-व्यवसायांचे स्टॉल्स असतील.
लोकांनी दुबईला यावे, इथली प्रगती पाहावी, इथल्या उद्योग-व्यावसायिकांना भेटावे आणि मग आखाती देशांशी व्यवहार करावा की नाही हे ठरवावे, अशी आमची इच्छा आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ऍन्ड ऍग्रीकल्चर, इंडियन मर्चंटस् चेंबर आणि इंडो अरब चेंबर ऑफ कॉमर्स ऍन्ड इंडस्ट्रिज यांनी या उपक्रमाला सर्वतोपरी मदत मान्य केली आहे. संयुक्त अरब अमिराती आणि भारतातल्या इतर ठिकाणांहूनही मदत मिळते आहे.
परिषदेसाठी स्वतंत्र समिती स्थापन केली आहे. मध्यवर्ती समितीमध्ये डॉ. सुनिल मांजरेकर, विवेक कोल्हटकर, ऑरेन हेरिकेन्स, चिरंतन जोशी, विलास नारगुंड, नितीन सातस्कर, विकास घोरपडे, शिरिष पटवर्धन आदींचा समावेश आहे. विठ्ठल कामत, मीनल मोहाडीकर, श्रीराम दांडेकर, अभिजित पाटील, अजिंक्य देसाई आदींनी महाराष्ट्रातून आम्हाला सहकार्य देऊ केले आहे.

**प्रश्न** - महाराष्ट्र सरकारकडून काही मदत?

**उत्तर -** आतापर्यंत तरी महाराष्ट्र सरकारने या विभागात फारसा रस दाखविलेला नाही. जणू काही आखाताशी व्यवहाराची सरकारला इच्छा नाही. आम्ही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विविध खात्यांचे सचिव आणि सरकारमधील इतर मान्यवरांना आमंत्रणे दिली आहेत. कोणाकडूनही अद्याप काही प्रतिसाद आलेला नाही. केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेशची सरकार अनिवासी भारतीयांकडून गुंतवणूकीसाठी विविध योजना आणत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचा अनुभव निराशाजनक आहे. आम्ही सरकारकडून कोणत्याही प्रकारच्या आर्थिक सहकार्याची अपेक्षा केलेली नाही. या उपक्रमाची दखल घ्यावी आणि सहभागी होऊन बळ द्यावे, एवढीच माफक अपेक्षा आहे. कारण आम्हाला महाराष्ट्रातील कृषी, पर्यटन, लघू-मध्यम उद्योग आणि शिक्षण क्षेत्रांमध्ये लक्ष केंद्रीत करायचे आहे.

**प्रश्न** - महाराष्ट्र सरकारकडून अपेक्षा काय आहेत?

**उत्तर -** महाराष्ट्र सरकारने संयुक्त अरब अमिरातमधल व्यापाराचे महत्त्व ओळखले पाहिजे. आखाती देशांमधून गुंतवणूक मिळवण्यासाठी आणि या देशाबरोबरचा व्यापार वाढविण्यासाठी गल्फ सहकार्य मंडळामधील अनिवासी भारतीयांना महाराष्ट्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेताना सहभागी करून घेतले पाहिजे. संयुक्त अरब अमिरातमध्ये महाराष्ट्र उद्योग भवन उभारण्यासाठी जीएमबीएफ करीत असलेल्या प्रयत्नांना महाराष्ट्र सरकारने हातभार लावला, तर आम्ही त्याचे स्वागतच करू. गेल्या सहा वर्षांपासून सरकारच्या कोणत्याही मदतीशिवाय आम्ही हे काम करीत आहोत आणि करतच राहू. गरज पडल्यास खासगी उद्योजकांचे सहकार्य घेऊ.

**प्रश्न** - तुमच्या भविष्यात काय योजना आहेत?

**उत्तर -** जीएमबीएफच्या योजनांमध्ये भारत, गल्फ सहकार्य मंडळ आणि मध्य आशियातील उद्योजकांना सहभागी करून घेण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. युरोपमधील उद्योजकांबरोबर काही संयुक्त प्रकल्प उभारण्याचाही आम्ही विचार करीत आहोत. संयुक्त अरब अमिरातमध्ये महाराष्ट्र उद्योग भवन उभारण्याची आमची इच्छा आहे. गेल्या काही वर्षांपासून उद्योजक आणि व्यावसायिकांना जगभरात व्यवसायवाढीसाठी हातभार लावण्यात जीएमबीएफने महत्त्वाची भूमिका बजावली

आहे.

महाबिझ् २०१० दुबई
परिषदेची तारीख - २३, २४ एप्रिल.
परिषदेचे स्थळ - दुबई कल्चरल ऍन्ड सायन्टिफिक सेंटर, मामझार, दुबई
अधिक संपर्क - gmbf@mahabizme.com
वेबसाईट - http://www.mahabizme.com

**दुबईत होणाऱ्या पहिल्या आखाती मराठी उद्योजक परिषदेचे सविस्तर वृत्त वाचण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा.**

दुबईत एप्रिलमध्ये आखाती मराठी उद्योजक परिषद

# दुबईत एप्रिलमध्ये आखाती मराठी उद्योजक परिषद

सकाळ वृत्तसेवा

Thursday, March 11, 2010 AT 09:31 PM (IST)

Tags: gmbf, mahabiz, uae, dubai, business, international

पुणे - दुबईत एप्रिलमध्ये होणाऱ्या पहिल्या आखाती मराठी उद्योजक परिषदेत (महाबिझ) सुमारे अडीचशे उद्योजक सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. 23 आणि 24 एप्रिलला ही परिषद होत आहे. गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमने (जीएमबीएफ) या उपक्रमाचे आयोजन केले आहे. परिषदेचे निमंत्रक आणि "जीएमबीएफ'चे संस्थापक संदीप कडवे यांनी "सकाळ'ला ही माहिती दिली.

आखातातील महाराष्ट्रीय उद्योजकांना एकत्र करणे, त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, आखाती देश व महाराष्ट्र यांच्यातील उद्योग-व्यापाराच्या संधी वाढविणे हा परिषदेचा हेतू असल्याचे श्री. कडवे यांनी सांगितले. संयुक्त अरब अमिरातींमध्ये महाराष्ट्र उद्योग भवन उभारण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

"जीएमबीएफ' गेली सहा वर्षे आखाती प्रदेशात महाराष्ट्रीय उद्योजकांसाठी काम करते आहे. उद्योजकांना आणि गुंतवणूकदारांना योग्य मार्गदर्शन करून व्यापार-उद्योग वाढविण्यासाठी या कामाचा उपयोग होत आहे. "जीएमबीएफ'चे आखाती प्रदेशात नोकरदार वगळता व्यापार, उद्योग क्षेत्रात सुमारे पाच हजार महाराष्ट्रीय कार्यरत आहेत. या सर्व स्रोतांना संघटित केल्यास आखाती देश आणि महाराष्ट्र यांच्यातील उद्योग-व्यापार वाढीसाठी मोठी मदत होईल, असा विश्वास श्री. कडवे यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर, इंडियन मर्चंट्‌स चेंबर, इंडो अरब चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यांनी या उपक्रमाला सहकार्य देऊ केले असल्याचे त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्र सरकारकडून प्रतिसाद नाही**

महाराष्ट्र सरकारला या उपक्रमाची कल्पना दिलेली आहे. तथापि, सरकारने कोणत्याही स्वरूपाचा प्रतिसाद दिलेला नाही, असे एका प्रश्नावर श्री. कडवे यांनी सांगितले. कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेशची सरकारे आखाती प्रदेशात वेगवेगळे उपक्रम राबवितात. मराठी उद्योजकांनी संघटितपणे उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला, तरी महाराष्ट्र सरकारला त्याची दखल घ्यावीशी वाटत नाही, असे मत

त्यांनी मांडले.

**'जीएमबीएफ'चे संस्थापक संदीप कडवे यांनी या परिषदेच्या पार्श्वभूमीवर इ-सकाळला दिलेली मुलाखत वाचण्यासाठी खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करा.**

मराठी उद्यमशीलता आखातात बहरावी : कडवे

# दुबईत मनोहर जोशींच्या हस्ते 'महाबिझ'चे उद्‌घाटन

सकाळ वृत्तसेवा

Saturday, April 10, 2010 AT 01:07 PM (IST)

Tags: gmbf, mahabiz, uae, dubai, marathi, business, international,

पुणे - दुबईत होत असलेल्या पहिल्या आखाती मराठी उद्योजक परिषदेचे उद्‌घाटन शिवसेनेचे नेते आणि खासदार मनोहर जोशी यांच्या हस्ते होणार आहे. खासदार आणि उद्योगपती शिवाजीराव आढळराव-पाटील हेदेखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते परिषदेच्या निमित्ताने आयोजित केलेल्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन होणार आहे. परिषदेचे निमंत्रक आणि गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमचे (जीएमबीएफ) संस्थापक संदीप कडवे यांनी "इ-सकाळ'ला ही माहिती दिली. परिषदेचे "महाबिझ २०१०' असे नामकरण करण्यात आले आहे.

येत्या २३ आणि २४ एप्रिलला होणाऱ्या या परिषदेला संयुक्त अरब अमिरातमधील भारताचे राजदूत एम. के. लोकेश आणि भारतीय उच्चायुक्त संजय वर्मा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दोन्ही देशांमधील सरकारी अधिकारी, उद्योगपती यांच्यासह सुमारे २५० मान्यवर या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. परिषदेची कार्यक्रमपत्रिका तयार करण्यात येत असून, त्यासाठी विविध मान्यवर वक्त्यांशी चर्चा करून त्यांची वेळ निश्चित करण्यात येत असल्याचे कडवे यांनी सांगितले.

संयुक्त अरब अमिरातचे स्थानिक नेते, तेथील संघटनांचे प्रतिनिधी आणि अनिवासी भारतीय उद्योगपती यांनाही परिषदेत सहभागी करून घेण्याची नियोजन आहे. परिषदेच्या ठिकाणीच आयोजिण्यात आलेल्या प्रदर्शनामध्ये २५ स्टॉल उभारण्यात येतील. यामध्ये प्रामुख्याने कृषी व अन्न उत्पादनांचे स्टॉल असणार आहेत. याशिवाय शिक्षण, पर्यटन, माहिती-तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, व्यापार इत्यादी क्षेत्रांशी संबंधित स्टॉलही असतील.

आखातातील महाराष्ट्रीय उद्योजकांना एकत्र करणे, आखाती देश आणि महाराष्ट्र यांच्यातील उद्योग-व्यापाराच्या संधी वाढविणे हा या परिषदेचा हेतू असून, त्यादृष्टिने संयुक्त अरब अमिरातमध्ये महाराष्ट्र उद्योग भवन उभारण्याच्या दृष्टिने प्रयत्न सुरू असल्याचे कडवे यांनी सांगितले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर, महाराष्ट्र इकोनॉमिक

डेव्हलपमेंट कौन्सिल, इंडो-अरब चेंबर ऑफ कॉमर्स ऍण्ड इंडस्ट्री, इंडियन मर्चंट्स चेंबर आणि जागतिक मराठी चेंबर ऑफ कॉमर्स ऍण्ड इंडस्ट्री या संघटनांनी "महाबिझ २०१०'ला पाठिंबा दिला आहे.

महाबिझ् २०१० दुबई
परिषदेची तारीख - २३, २४ एप्रिल.
परिषदेचे स्थळ - दुबई कल्चरल ऍन्ड सायन्टिफिक सेंटर, मामझार, दुबई
अधिक संपर्क - gmbf@mahabizme.com
वेबसाईट - http://www.mahabizme.com

# गल्फ-महाराष्ट्र व्यापार संमेलनाला मानसिंग पवार प्रमुख पाहुणे

सकाळ वृत्तसेवा

Friday, April 23, 2010 AT 12:00 AM (IST)

Tags: mahabeej 2010, gmbf, aurangabad, marathwada

औरंगाबाद - पहिले गल्फ महाराष्ट्र व्यापार संमेलन 'महाबिझ-2010-दुबई'चे गल्फ महाराष्ट्र बिझिनेस फोरमतर्फे (जीएमबीएफ) दुबई येथे 23 व 24 एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ऍग्रिकल्चरतर्फे या संमेलनास सहकार्य आणि पाठिंबा दर्शविला असून महाराष्ट्र चेम्बरचे वरिष्ठ उपाध्यक्ष मानसिंग पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून या संमेलनात उपस्थित राहणार आहे. त्यांच्यासोबत प्रसिद्ध उद्योगपती व निर्लेप उद्योगसमूहाचे संचालक मुकुंद भोगले, उद्योगपती उल्हास गवळी, हे देखील सहभागी होत आहे.

या संमेलनात उद्योग संघटना, सरकारी विभाग, देशातील व महाराष्ट्रातील उद्योजक व प्रतिनिधींच्या सहभागासाठी गल्फ महाराष्ट्र बिझिनेस फोरमकडून मोर्चेबांधणी सुरू झाली असून आखाती देशांव्यतिरिक्त अमेरिका, पूर्वेकडील देश व युरोप येथूनही उत्तम प्रतिसाद व सहभाग राहील, असे फोरमचे निमंत्रक संदीप कडवे व सहनिमंत्रक डॉ. सुनील मांजरेकर यांनी सांगितले आहे. संयुक्त अरब अमिरातीतील विविध उद्योगक्षेत्रात सध्या महाराष्ट्रीय मूळ असलेले दोन हजारहून अधिक उद्योजक, व्यावसायिक आणि व्यापारी कार्यरत असून संपूर्ण आखाती देशांचा विचार केल्यास ही संख्या पाच हजारांहून अधिक होईल. यात विविध आस्थापनांमधील पगारदार कर्मचारी- अधिकाऱ्यांचा समावेश केला गेलेला नाही. सध्याच्या मंदीच्या फेऱ्यामुळे अनेक भारतीय व्यावसायिकांना विपरीत परिणाम सोसावा लागला असला तरी परिस्थिती सुधारत आहे. गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमच्या मते सध्याचा काळ हा नवीन व्यावसायिक धाडसाच्या दृष्टीने खडतर असला तरी काही क्षेत्रात सुसंधी निर्माण झाली आहे. प्रस्तावित संमेलन हे या अशाच संधींना नेमके ओळखून त्याचे सोने करण्यासाठी उद्योजकांची सुसज्जता करण्यासाठी योजले गेले आहे.

On 4/23/2010 11:20 AM **RAJAN HOUZWALA** said:

मानसिंग तुस्सी ग्रेट हो ! मराठवाड्याच्या सुपुत्राची घोड दौड अंतर राष्ट्रीय पातळीवर होत आहे हे बघून खूप खूप आनंद होतो. मराठवाड्याच्या व्यापार्यांच्या समस्यांची आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करून जागतिक स्पर्धेत सक्षम बनविण्याचे धोरण आपण वापरावे हि अपेक्षा. आपल्या सोबत येत असलेल्या श्री मुकुंद भोगले आणि श्री उल्हास गावली यानाही व्यापारी महासंघ औरंगाबाद तर्फे अनेक शुभेच्छा ! राजन होऊज्वाला

# 'महाबिझ्' परिषदेचे दुबईत उदघाटन

सकाळ वृत्तसेवा

Saturday, April 24, 2010 AT 01:19 PM (IST)

Tags: mahabeej 2010, gmbf, dubai,




पुणे - दुबईत प्रथमच होत असलेल्या आखाती मराठी उद्योजक परिषदेचे (महाबिझ्) उदघाटन शिवसेनेचे खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी झाले.

उदघाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून भारताचे राजदूत एम. के. लोकेश, भारतीय उच्चायुक्त संजीव वर्मा, महानंदचे चेअरमन विनायक पाटील, 'एइडीसी'चे चेअरमन विठ्ठल कामत, 'एमएसीसीआयए'चे निर्वाचित अध्यक्ष मानसिंग पवार, 'आयबीपीसी'चे चेअरमन सुदेश अगरवाल, सुधीर मांडके, संदीप कडवे, सहनिमंत्रक डॉ. सुनील मांजरेकर आदी उपस्थित होते.

गल्फ महाराष्ट्र बिझिनेस फोरमतर्फे (जीएमबीएफ) आणि इंडिया ट्रेड एक्झिबिशन सेंटर (आयएटीसी) यांनी या परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेस २०० प्रतिनिधी, उद्योजक उपस्थित राहिले असून, प्रदर्शनात १४ स्टॉल्स लावण्यात आले आहेत. परिषदेच्या पहिल्याच वर्षात चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे, सहनिमंत्रक डॉ. सुनील मांजरेकर यांनी सांगितले.

आखातातील महाराष्ट्रीय उद्योजकांना एकत्र करणे, त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, आखाती देश व महाराष्ट्र यांच्यातील उद्योग-व्यापाराच्या संधी वाढविणे या उद्देशाने परिषदेचे आय़ोजन करण्यात आले आहे.

# 'भारत व यूएई व्यापारी संबंध दृढ व्हावेत'

सकाळ वृत्तसेवा

Monday, April 26, 2010 AT 12:00 AM (IST)

Tags: gmbf, mahabiz, uae, dubai, marathi, business, international,



दुबई - भारत आणि संयुक्त अरब अमिरातमधील (यूएई) व्यापारविषयक संबंध दृढ व्हावेत, अशी अपेक्षा दुबईत पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या आखाती मराठी उद्योजक परिषदेमध्ये सहभागी झालेल्या मान्यवरांनी व्यक्त केली. परिषदेचे निमंत्रक आणि गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमचे संस्थापक संदीप कडवे यांनी ही माहिती दिली.

गेल्या २३ आणि २४ एप्रिलला येथील दुबई कल्चरल सेंटर अँड सायंटिफिक सेंटरमध्ये ही परिषद पार पडली. शिवसेनेचे खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भारताचे संयुक्त अरब अमिरातमधील राजदूत एम. के. लोकेश, तेथील भारतीय उच्चायुक्त संजय शर्मा, महानंदचे अध्यक्ष विनायक पाटील, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष मानसिंग पवार, हॉटेल व्यावसायिक विठ्ठल कामत, सुधीर मांडके आदी उपस्थित होते. एकूण अडीचशे जणांनी या

परिषदेत सहभाग घेतला. त्यामध्ये भारतातील ९० आणि संयुक्त अरब अमिरातीतील १६० जणांचा समावेश होता.

मुंबई ज्याप्रमाणे भारताची आर्थिक राजधानी आहे. त्याप्रमाणेच संयुक्त अरब अमिरातमध्ये दुबईचे स्थान असल्याचे लोकेश यांनी सांगितले. या परिषदेमुळे भारत आणि संयुक्त अरब अमिरातमधील व्यापारविषयक संबंधांमध्ये नवे पर्व सुरू होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दोन्ही देशांमधील व्यापाराचा विस्तार करण्याची मागणी शर्मा यांनी व्यक्त केली. दोन्ही देशांमध्ये सध्या फक्त सोने आणि तेल यांचाच प्रामुख्याने व्यापार होतो. व्यापारासाठी नवनवीन क्षेत्रांचा विचार केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

परिषदेत पर्यटन, २०१० दशक भागीदारीचे, आखाती देशात नाशवंत पदार्थांच्या विपणनातील आव्हाने, शिक्षण आणि उद्योग, रासायनिक प्रक्रिया उद्योगांचे पूर्वेकडे होत असलेले स्थलांतर इत्यादी परिसंवाद आयोजित करण्यात आले होते. परिषदेच्या निमित्ताने प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अभियांत्रिकी, आरोग्य, शिक्षण, खाद्यपदार्थ, सल्लागार सेवा इत्यादी विषयातील १५ स्टॉल उभारण्यात आले होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अँड ऍग्रिकल्चरच्या माजी अध्यक्ष मीनल मोहाडीकर यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचा समारोप झाला. या कार्यक्रमाला जळगावचे माजी आमदार जयप्रकाश बावीस्कर, राजा-राणी ट्रॅव्हल्सचे अध्यक्ष अभिजित पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संयोजन समितीचे विवेक कोल्हटकर यांनी परिषदेला पाठिंबा देणारे आणि उपस्थित असलेल्यांचे आभार मानले. परिषदेचे सहनिमंत्रक डॉ. सुनील मांजरेकर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.